# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७९३ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/१२/२०१७

**१) हुंडयाची मागणी करुन लग्न तोडल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०४/२०१७ चे आज पावेतो यातील आरोपी क्र. १ ने तिचा मुलगा आरोपी क्र. २ याचे फिर्यादीची मुलगी हीचे सोबत लग्न जोडुन सगाई करुन नंतर लग्नात नगदी ५,००,०००/—रु. हुंडा व सोन्याचे दागीने येवढया हुंडयाची मागणी केली परंतु त्यांनी हुंडयाची मागणी फिर्यादीने अमान्य केल्याने आरोपी यांनी सगाई करुन जोडलेले लग्न तोडल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३,४ हुंडा प्रती. कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्वत:चे मरणास कारणभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ३०/११/२०१७ चे १५.३०ते १७.०० वाजता दरम्यान यातील स्वराज कंपनीचा बिना नंबरचा ट्रॅक्टर मृतक आरोपी ट्रॅक्टर चालक यांनी त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर फिर्यादीचे शेतामध्ये हयगयीने, निष्काळजीपने चालवुन ट्रॅक्टर वरुन खाली पडुन मागील चाकात येवुन त्याचे अंगावर ट्रॅक्टर गेल्याने जागीच मरण पावल्याने फिर्यादी एकनाथ महादेव मिसाळ वय ४१ वर्ष, रा. डोकेसरांडी यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन झेंडा व फलक काढुन भावना दुखावल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/११/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन खुल्या जागेवर लावण्यात आलेला हलबा समाजाचा झेंडा व फलक काढुन आदिवासी समाजाचे अपमान व भावना दुखावण्याचे कृत्य आरोपीतांनी केल्याने फिर्यादी खुशाल रामदास निनावे वय ४० वर्ष, रा. दिघोरी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २९४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल स्लीप होवुन खाली पडुन उपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु . :—**

दिनांक १३/११/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक विजय देवराम मेश्राम वय २७ वर्ष, रा. पेंढरी हा त्याचे हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच ३६/५६८६ ने मित्र सुखदेव गिन्हेपुंजे याचे सह जातांनी दिघोरी गावाजवळ त्याची मोटार सायकल ही स्लीप झाली त्यामुळे खाली पडुन डोक्याला व चेहऱ्याला जबर मार लागल्याने फोन क्र. व्दारे १०८ वरुन सा. रु. भंडारा येथे प्रथम उपचार करुन रेफर केल्याने नागपुर मेडीकल ट्रामा सेंटर मध्ये भरती केले असता उपचार दरम्यान मरण पावल्याने मृतक स्वत: मोटार सायकल व्दारे स्लिप होवुन स्वत:चे मृत्युस कारणीभुत झाल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र जा. क्र. ६५१/१७ दि १६/११/२०१७ चे अन्वये प्राप्त झाल्याने पो. स्टे. ला सरतर्फे फिर्यादी मपोना. गणविर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ३०/११/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे पतीस घराबाहेर बोलावुन तु आम्हला झुरतोस असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन नंतर पती डयुटीवर निघुन गेल्यावर फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन 'तुझया नवऱ्याची रिपोर्ट करुन फसवतो व त्याची डयुटी खातो' अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) विद्युत तारेचा करंट लागुन महिलेचा मृत्यु . :—

दिनांक ३०/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गणेश धोंडु मते वय ४५ वर्ष, रा . धुसाळा याने शेतीला लागुन असलेला शेतकरी आरोपी यांनी त्याचे शेतात विद्युत तार लावुन त्यास जाणीवपुर्वक अनाधिकृतपणे विद्युत प्रवाह सुरु करुन ठेवले असता यातील फिर्यादीची पत्नी सौ. सुनिता गणेश मते वय ४० वर्ष ही त्या ठिकाणा वरुन शौचास जातांना तिला प्रवाहीत करुन ठेवलेल्या विद्युत तारेचा करंट लागुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३०४(२) भादवि. सहकलम १३५ भा.वि. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

७) दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ३०/११/२०१७ चे ०१.२० ते ०२.३० वाजता दरम्यान यातील इसम विधी संघर्ष बालक हा आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र अपराध करण्याचे बेताने मिळुन आल्याने सरतर्फे पोउपनि. मेसरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२(क) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

८) दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ३०/११/२०१७ चे १७.०० ते १७.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारूचे नशेत चालविंतानी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. दिघोरे वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. दुधकवरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ३०/११/२०१७ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सफौ. बावने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**१०) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु.:—**

दिनांक ०९/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. गिता किशोर ऊईके वय ४५ वर्ष, रा. पवनार खारी ही दिंनाक ०९/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान गाय व बैल चारण्या करीता घराशेजारी घेवुन गेली असता मृतकला मागेहुन बैलाने धडक दिल्याने तिचे पाठीला, मानेला मार लागल्याने तिला औषधोपचार करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १६७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निखारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत

**११) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक ३०/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, करडी, वरठी, तुमसर, गोबरवाही, लाखनी व अडयाळ येथील अवैध दारू जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण १४ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १६० लिटर हातभट्टी दारू + २२५ सडवा+ साहित्य किंमती २३,८२५/—रु. व ५ लिटर ३४० मिली लिटर देशी+ विदेशी दारु + बिअर व विदेशी खाली बॉटल किंमती असा एकुण २५,५०६/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ३०/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०४ तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ६८ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.